# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025

# पाटणच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमधील विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश

▲ पाटण, दि. १० : कोयना एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटण या कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले.

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी जून २०२४ मध्ये घेतलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत ओंकार यादव याने ८५.३३ टक्के गुण मिळवून सातारा विभागात प्रथम क्रमांक मिळविला. प्रतील शेडगे याने ८४.५० टक्के गुण मिळवून द्वितीय तर यश गणेशकर याने ८२.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. याशिवाय इतर विद्यार्थ्यांनी देखील या अभ्यासक्रमाच्या परीक्षेत सर्वोत्तम यश संपादन केले आहे.

त्याचबरोबर सर्टिफिकेट कोर्स इन फूड अँड बेव्हरेज सर्व्हिस या परीक्षेत सतीश कदम याने सातारा विभागात ८७.२५ टक्के गुण मिळवून प्रथम, धीरज माने ८५.२५ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि धनराज माळी व सुमीत भोसले यांनी ८४.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक असे यश संपादन केले आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटणने दरवर्षीप्रमाणे या विद्यार्थ्यांनी देखील कॉलेजचा निकाल १०० टक्के लावण्याची परंपरा तर ठेवलीच त्याचबरोबर सातारा जिल्ह्यातून प्रथम येण्याचेदेखील श्रेय मिळवले आहे. इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मेनेजमेंट, पाटण हे सातारा जिल्ह्यातील एकमेव आयएसओ (९००१:२००५) मानांकित कॉलेज असून अल्पावधीत कॉलेजने हे उत्तुंग यश संपादन केले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक तालुका तसेच जिल्ह्यातून विद्यार्थी येऊन या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. सर्व विद्यार्थी आज कॉलेज कॅम्पसमधून निवड होऊन ५ स्टार हॉटेल्समध्ये ट्रेनिंग करत आहेत. विद्यार्थ्यांनी हे उत्तंग यश संपादन केले असल्याने सर्व संस्थेतून पालक व शिक्षक वर्गातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे.

हॉटेल मॅनेजमेंटचे प्राचार्य चेतन सावंत, प्रा. अमोल चव्हाण, प्रा. समीर सपकाळ, प्रा. भरत कांबळे, शिक्षकेतर वर्ग यांची विद्यार्थ्यांच्या या यशासाठी बहुमोल मदत मिळाली. या यशाबद्दल त्यांचे कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण, जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर यांच्यासह पालक व शिक्षकांनी अभिनंदन केले.